आर.सी.सी क्र. ७९०/२०२५
सरकार विरुध्द हर्षकुमार व इतर
**निशाणी क्र.२६३/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक–३ यांची जबानी–**
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,
**माझे नाव – श्री. देवलिंग राजेंद्र थलपती,**
वय – ४० वर्षे, व्यवसाय – टेलरकाम,
निवासस्थान– एन–६, सिंहगड कॉलनी, सिडको, छत्रपती संभाजीनगर.

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**
**विद्वान श्रीमती एम.एस. राऊत, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –**

१. मी गेल्या १५ वर्षांपासून टेलरकाम करतो. मी रंगोली कलेक्शन्स या कपड्याच्या दुकाना गेल्या चार वर्षापासून टेलरींग विषयीचे काम करतो. दिनांक २१.०१.२०२४ रोजी मला पोलीसांचा फोन आला होता. मला पोलीसांनी दुस–या दिवशी विचारपुस करायला पोलीसांनी बोलाविले होते. मला पोलीसांनी याकरीता पत्र दिले होते. ते पत्र मला आता दाखविले. यावर माझेच नाव असून पत्र मिळाले म्हणून माझी सही आहे. या पत्रास **निशाणी क्रमांक २६४** देण्यात येत आहे.

२. रंगोली कलेक्शन्स या दुकानात येणार ग्राहक हे त्या दुकानात कापड खरेदी करतात व ते कपडे शिवण्याकरीता मला बोलावितात. पॅन्ट शर्ट, कुर्ता, पैजामा, ब्लेझर, शेरवानी इत्यादी कपडे मी शिवून देतो. मला दिनांक ११.०८.२०२५ रोजी माप घ्यायला बोलाविले होते. हर्षकुमार क्षिरसागर, बी.के. जीवन आणि अनिल क्षिरसागर, हर्षकुमार यांचे लहान भाऊ नामे यश व बाकी त्यांचे इतर मित्र परिवार यांचे माप घ्यायला मी गेलो होतो. मी, त्या सर्वांचे कपड्यांची मापे घेतली. मी दिनांक १४.०८.२०२५ रोजी प्रथम हर्षकुमार क्षिरसागर यांचे कपडे शिवून दिले. कपडे हे रंगोली कलेक्शन्स या दुकानावर दिले. यामध्ये दोन पॅन्ट शर्ट होते. त्याच्या नंतर त्यांच्या ऑर्डर प्रमाणे त्यांचे कपडे मी शिवून तारखेनुसार रंगोली कलेक्शन्समध्ये नेऊन दिले. कपडे हे दसरा, दिवाळी, १५ ऑगस्ट, व त्यांच्या घरी असणारे इतर कार्यक्रम यासाठी कपडे शिवले होते. या कपड्यांमध्ये पॅन्ट शर्ट, कुर्ता, पैजामा, ब्लेझर असे कपडे शिवले होते. कपडे शिवण्याकरीता रंगोली कलेक्शन्सकडुन मला ऑर्डर फॉम, मेजरमेंट शिट व कपडा हे दिल्या जाते. हे आल्यानंतर ऑर्ड फॉम व मेजरमेंट शिट प्रमाणे ते कापड शिवून दिले जाते. हे शिवून झाल्यावर रंगोली कलेक्शन्सच्या शोरूममध्ये दिले जाते. हे कपडे सियाराम, रेमंड, रेड ॲण्ड

टेलर इत्यादी ब्रॉण्डचे कापडाप्रमाणे या सर्वांना मी कपडे शिवून दिले. या सर्वांचे मी साधारण तीन एक शे कपडे शिवून दिले असतील. मी हे ऑर्डर फॉम जर पाहिले तर मी ओळखेल.

**ऑर्डर फॉम व इतर कागदपत्रांच्या पुर्ततेसाठी अभियोग पक्षा तर्फे उर्वरीत सरतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.**

समक्ष
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– १६/०४/२०२६.

श्रवणोत्तर स्वीकृती.
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद